-: प्रेसनोट दिनांक- ०६/०६/२०२४ :-

आरोपी लोकसेवक १) प्रदिप अंनत कांबळे वय - ३२ वर्षे, तलाठी, सज्जा जैन्याळ - मुगळी ता. कागल, जि.कोल्हापूर वर्ग - ३, रा. रोहीदास गल्ल्ली, श्री जगन्नाथ पुजारी यांचे घरी भाडयाने मुरगुड, ता. कागल, जि.कोल्हापूर मुळ रा.तरसंबळे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर, २) गणपती रघुनाथ शेळके, वय - ४६, रा.जैन्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत......

---

यातील मुळ तक्रारदार यांचे वडीलार्जीत शेतजमीन मुगळी, ता. कागल येथे शेती गट नंबर ३५१ मध्ये आहे. सदर जमीनीचे हक्कसोडपत्र तक्रारदार यांनी करून घेतले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी सदर हक्कसोडपत्राप्रमाणे गट नंबर ३५१ मधील शेतजमीनीच्या डायरी उता-यावर त्यांचे नाव नोंद होणेसाठी मुगळी तलाठी कार्यालयात कागदपत्रे सादर केली होती. तक्रारदार यांचे समाईक शेतजमीनवरती कर्ज असलेमुळे सदर कर्ज भरून बोजा कमी होणे आवश्यक असलेबाबत तक्रारदार यांना तलाठी कांबळे यांनी सांगितल्याने तक्रारदार यांनी सदरचे कर्ज भरलें त्याकरीता मंडल अधिकारी लिंगनुर, ता. कागल येथे मंडल अधिकारी यांचेसमोर सुनावणी झाली होती. त्यानंतर त्यांनी शेतजमीन वरील बोजा कमी झाला असुन माझे नावावर दस्ताप्रमाणे जमीन नोंद करून डायरी उतारा करणेकरीता आदेश दिला होता. तो आदेश मुगळी तलाठी यांचेकडे आला असुन तक्रारदार हे त्यांचे नावावर डायरी उतारा घातला आहे का हे पाहणेसाठी तलाठी यांना भेटले त्यावेळी त्यांनी प्रकरण पाहुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार तलाठी कार्यालयातुन बाहेर येत असताना तलाठी कार्यालयात काम करणारा गणेश शेळके यांनी तक्रारदार यांना डायरी उतारा घालुन देणेसाठी तलाठी कांबळे यांना ५,०००/- रूपये दयावे लागतील नाही दिलेतर काम होणार नाही असे म्हणुन तलाठी कांबळे यांचेकरीता ५,०००/- रू. लाचेची मागणी करत असलेबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे मुगळी गावातील शेत जमीनीचे हक्क सोडपत्राप्रमाणे शेत जमीनीच्या डायरी उता-यावर नाव नोंदणी करण्यासाठी व नाव नोंदणी करून डायरी उतारा देण्याकरीता आलोसे कमांक ०२ **गणपती शेळके** यांनी आलोसे कमांक ०१ तलाठी कांबळे यांचेसाठी ५,०००/- रूपये लाचेची मागणी केली तसेच आलोसे कमांक ०२ तलाठी कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे आलोसे कमांक ०२ यांनी मागणी केलेले ५०००/- रूपये हे लिंगनुर सर्कल यांच्याकडे देण्यास प्रोत्साहन दिल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यावरून **आरोपी लोकसेवक १) प्रदिप अंनत कांबळे वय - ३२ वर्षे, तलाठी, सज्जा जैन्याळ - मुगळी ता.कागल, जि.कोल्हापूर** वर्ग - ३, रा. रोहीदास गल्ल्ली, श्री जगन्नाथ पुजारी यांचे घरी भाडयाने मुरगुड, ता.कागल, जि.कोल्हापूर मुळ रा.तरसंबळे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर, २) **गणपती रघुनाथ शेळके, वय - ४६, रा.जैन्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर** यांचेविरुध्द मुरगुड पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री बापू साळुंके, पोलीस निरीक्षक, श्री विकास माने, पो.हे.कॉ., श्री सुनिल घोसाळकर, श्री संदिप काशीद, पो.हे.कॉ., श्री सचिन पाटील, पो.ना. श्री संदिप पवार पो.कॉ. ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.